तरुण भारत

ता. ११/६/१९८९







# बालरंजन वर्धापनदिनाचा नेटका, सुरेख सोहळा

**श्री.** अमोल पालेकर आणि श्री. राजाराम शिंदे यांच्या उपस्थितीत 'बालरंजन' या बालनाट्य संस्थेचा पंधरावा वर्धापनदिन सोहळा ४ जूनला सुरेख साजरा झाला. कल्पक, नेटका व सुरेख कार्यक्रम तासाभरात बसविणाऱ्या संयोजकांचे कौतुक करायला हवे.

या सोहळ्यात अध्यक्ष श्री. शिंदे यांनी नटराजपूजन केले. तत्पूर्वी स्वागत-गीत सादर करण्यात आले. पुरुषोत्तम दारव्हेकर यांच्या रचनेला सदानंद यांनी संगीत दिले होते. स्मिता खर्डेनविस, रंजना जोशी, देवयानी पेंडसे, विजयकुमार वेखंडे, रवी खाडे, शशिकांत शेंबेकर, अमर कोल्हटकर आणि जयश्री समुद्र हे गायनात सहभागी झाले होते.

मनोरंजनाचे विविध कार्यक्रमही या निमित्ताने सादर करण्यात आले. बालरंजनच्या बालकलावंतांच्या कलागुणांचा परिचय त्याद्वारे झाला. प्रारंभी राधिका वैद्य हिने संस्कृत प्रार्थना सादर केली. बालरंजनच्या अतिशय गाजलेल्या 'माझा ज्ञानियांचा राजा' या डॉ. मधुकर आष्टीकरलिखित नाटकातील मुक्ताबाईचा प्रवेश राधिका पेंडसे हिने निखिल नागपूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केला. 'शिवाई' या रंजन दारव्हेकर लिखित नाटकातील एक प्रवेश आविष्कार दारव्हेकर याने केला.

बालकांना नाट्यकलेबरोबरच नृत्यकलेचेही धडे बालरंजन देत असते. संस्थेची कलावंत कु. गौरी काळे हिने कथ्थक नृत्य सादर करून रसिकांकडून दाद मिळविली. महाभारतातील द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग तिने नृत्याभिनयाद्वारे उत्तम वठविला. सुनिता बगाळे व राजश्री कयसीकर यांनी या सादरीकरणात तिला सहकार्य केले.

त्यानंतर रंजन कला मंदिरचे अध्यक्ष श्री. प्रभाकर चांदेकर यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या प्रगतीचा आढावा आटोपशीरपणे घेतला. सूत्रधार श्री. संजय पेंडसे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. बालकलावंत कु. आसावरी लखोटे हिने शिंदे यांचे व कु. वरदा गोखले हिने पालेकर यांचे स्वागत केले.

श्री. शिंदे यांनी बालरंजनच्या प्रगतीबद्दल आनंद व्यक्त केला. बालनाट्यांच्या चळवळीचा थोडक्यात आढावा घेऊन ते म्हणाले, बालरंजनचे यात मोलाचे योगदान आहे. बालरंगभूमीवरील काही समस्यांकडेही त्यांनी लक्ष वेधले आणि निराकरणासाठी संस्थांनी संघटित प्रयत्न करावे, असे आवाहन केले. श्री. पालेकर यांनी 'बालरंजन'ला शुभेच्छा दिल्या. सचिव चंद्रशेखर चौधरी यांनी आभार मानले. संचालन रूपश्री रत्नपारखी हिने केले.

■ आविष्कार दारव्हेकर
■ गौरी काळे
■ राधिका पेंडसे
■ अमोल पालेकर मार्गदर्शन करताना, शेजारी राजाराम शिंदे.